www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर

# महाराष्ट्र टाइम्स

पुणे, गुरुवार, १४ एप्रिल २०१६ ◆ पाने २४ (पुणे टाइम्ससह) ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.०० घटस्फो

# विद्यार्थ्यांच्या शंका झाल्या दूर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

स्वप्नील शिंदे



पोलिस उपायुक्त तुषार दोशी यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले.

गुन्हेगारी का कमी होत नाही... पोलिस दलात येण्यासाठी काय करावे... छेडछाड, सायबर क्राइम अशा गुन्ह्यांबाबत पोलिसांकडून काय उपाययोजना केल्या जातात. विधी संघर्ष बालक म्हणजे काय, त्यांना काय शिक्षा असते, अशा विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना पोलिस उपायुक्त तुषार दोशी यांनी दिलखुलासपणे उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. निमित्त होते. पोलिस अधिकारी व विद्यार्थ्यांच्या 'थेट भेट' कार्यक्रमाचे.

पंख व क्वीक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'थेट भेट' कार्यक्रमा अंतर्गत हुतात्मा बालवीर शिरीषकुमार शाळेतील विद्यार्थ्यांशी उपायुक्त तुषार दोशी यांची भेट घडवून आणली. शिक्षण संचालिका मीनाक्षी राऊत, क्वीक हील फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास काटकर, पोलिस निरीक्षक अरविंद गोकुळे आदर्श मित्र मंडळाचे अध्यक्ष उदय जगताप, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद भोई उपस्थित होते.

दोशी म्हणाले, 'बाल वयातच चुकीच्या गोष्टीपासून दूर राहून वाईट प्रवृत्तील थांबवू शकलो तर गुन्हेगारी कमी करण्यात यश येऊ शकते. गुन्हेगारीचा शिक्का बसल्यानंतर पोलिसांचा ससेमिरा सुरू होतो. त्या व्यक्तीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोनही बदलतो. मुलींची छेडछाड अथवा विनयभंगासारख्या घटना घडल्या, तर पालकांना सांगा. ते शक्य नसेल तर पोलिसा नियंत्रण कक्षाच्या शंभर क्रमांकावर संपर्क साधा. तुम्हाला तत्काळ मदत मिळेल. वाईट गोष्टी करणाऱ्या मित्रांची संगत सोडा आणि चांगल्या मित्रांच्या संगतीला लागा आणि चांगले ध्येय ठेवा' असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. पोलिस दलामध्ये महिलांसाठी तीस टक्के जागा राखीव आहेत. पोलिस दलात येण्यासाठी महिलांना स्पर्धा कमी आहे. चांगला अभ्यास आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम असावे लागते, असे ते म्हणाले.

**आठवड्यातून दोनदा मोबाईल तपासा**

मोबाईल ही आता गरज झाली आहे. त्यामुळे मोबाईल देऊ नका असे पालकांना म्हणणार नाही. पण, मुलांना मोबाईल दिल्यानंतर ते मोबाईलवर काय करतात. कोणाला फोन करतात. त्यामध्ये काय फोटो आहेत. हे पाहणे पालकांची जबाबदारी आहे. आठवड्यातून दोन वेळा मोबाईल तपासला पाहिजे, अशी सूचना त्यांनी केली.